# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.02.2026** **वारः सोमवार**

---

1. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर आधारित जागतिक स्तरावरील भारत ए आय इम्पॅट शिखर संमेलन आजपासून नवीदिल्लीत सुरू होणार
2. या परिषदेच्या अनुषंगाने इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो 2026 या प्रदर्शनाचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार
3. पश्चिम बंगालमधील सात सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निवडणूक आयोगाचे आदेश
4. सरसेनाध्यक्ष जनरल उपेंद्र द्विवेदी आजपासून चार दिवसाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आणि
5. वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट सामन्यात भारताचा पाकिस्तानवर 61 धावांनी रोमहर्षक विजय, भारतीय संघाचा प्रमुख 8 गटात समावेश.

**<u>शिखर संमेलन</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रात होणारा वाढता वापर आणि उपयोग लक्षात घेऊन आजपासून नवी दिल्लीत भारत ए आय इम्पॅट शिखर संमेलन सुरू होत आहे. ते पाच दिवस असेल. अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेवर व्यापक चर्चा घडवून आणणारं आणि विकसनशील देशात होणारं हे जगातल पहिलंच संमेलन आहे. या संमेलनात जगातील 20 देशांचे प्रमुख नेते सहभागी होणार आहेत. यामध्ये फ्रान्स चे राष्ट्रपती इमैनुएल मैक्रों, ब्राजीलचे राष्ट्रपती लुइज़ इनासियो लूला दा सिल्वा, स्पेनचे राष्ट्रपती पेड्रो सांचेज़ पेरेज़-कास्टेजोन, संयुक्त अरब अमीरातीचे राजे शेख खालिद बिन मोहम्मद बिन जायद अल नहयान, मॉरीशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम, भूतानचे पंतप्रधान छेरिंग तोबगे आदींचा समावेश आहे. याशिवाय संयुक्त राष्ट्रांचे महासचिव, अनेक जागतिक संघटनांचे पदाधिकारी आणि 45 देशांच्या मंत्र्यांचं प्रतिनिधी मंडळ या संमेलनात सहभागी होणार आहे.

**<u>एआय प्रदर्शन</u>**

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या प्रभावासंदर्भातल्या इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो 2026 या प्रदर्शनाचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेच्या अनुषंगानं हे पाच दिवसांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. या प्रदर्शनात ऑस्ट्रेलिया, रशिया, जपानसह 13 देश सहभागी झाले आहेत. प्रदर्शनातल्या 300 दालनांमधून नागरिक, पृथ्वी आणि विकास या संकल्पना मांडल्या जाणार आहेत. इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत आरोग्य, कृषी आणि प्रशासन क्षेत्रातल्या चांगल्या पर्यायांसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा विकास याविषयी चर्चा होणार आहे. दरम्यान, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय कृत्रिम बुद्धीमत्तेच्या नैतिक, समावेशक आणि जबाबदार उपयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी आज एक देशव्यापी डिजिटल अभियान सुरू करणार आहे. विश्वासार्ह आणि मानव केंद्रित एआय परिसंस्था उभी करण्याप्रतीच्या भारताच्या वचनबद्धतेला बळ देण हा या अभियानाचा उद्देश आहे.

**पंतप्रधान-अर्थसंकल्प**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून विकसित राष्ट्र बनण्याची भारताची आकांक्षा प्रतिबिंबित होत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. हा अर्थसंकल्प कोणत्याही दबावातून तयार करण्यात आलेला नाही, तर 'भविष्यासाठी आम्ही तयार आहोत', हा संदेश या अर्थसंकल्पातून दिला आहे, असं ते म्हणाले. उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या बळावर भारताला व्यापार करारांमध्ये ठाम भूमिका घेता आली आणि वाटाघाटी देखील करता आल्या, असं त्यांनी सांगितलं. विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना, खासगी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. यावेळी पंतप्रधानांनी युपीए सरकारवर जोरदार टीका केली.

**पंतप्रधान-यूसीएफ- अर्बन चॅलेंज फंड**

शहरांच्या विकासाकरता एक लाख कोटी रुपयांच्या यूसीएफ- अर्बन चॅलेंज फंडाला मंजुरी देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. उच्च दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी या फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाईल, यामुळे शहरं देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका निभावतील असं पंतप्रधान म्हणाले. यूसीएफ ही गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्रालयाची योजना आहे, सर्वसमावेशक, काटक, विधायक आणि पर्यावरणाला अनुकूल शहरांची उभारणी करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे पुढल्या पाच वर्षांत शहरी भागात चार लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

**निवडणूक-आयोग**

निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधील सात सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांवर अनेक अनियमिततेच्या आरोपांवरून शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. कॅनिंग पूर्वा इथल्या दोन आणि सुती, मयनागुरी, समशेरगंज, डेबरा आणि फराक्का मतदारसंघातील प्रत्येकी एका अधिकाऱ्याला कारवाईचा सामना करावा लागत आहे. आयोगाने काल राज्याच्या मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांना पत्र पाठवून या सात अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या 9 फेब्रुवारीच्या निर्देशांनूसार, निवडणूक आयोगाने मतदारयादी पुर्नरिक्षण प्रक्रियेशी संबंधित सर्व फॉर्म-7 आक्षेप निकाली काढण्याबाबत कठोर कारवाई करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना लिहिलेल्या एका वेगळ्या पत्रात म्हटल आहे की सादर केलेले सर्व फॉर्म-7 त्वरित संबंधित नोंदणी अधिकाऱ्यांकडे पाठवले पाहिजेत आणि प्रत्येक आक्षेप, कायद्यानुसार काटेकोरपणे सोडवला पाहिजे.

**निवडणूक-आयोग**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रिय समिती आज गुवाहाटीला भेट देणार आहे. आगामी काळात होणाऱ्या आसाम विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ही समिती राज्यातील तयारीचा आढावा घेणार आहे. निवडणूक आयुक्त एस. एस. संधू आणि विवेक जोशी यांचा समावेश असलेली ही केंद्रीय समिती तीन दिवसांच्या दौऱ्यात वरिष्ठ अधिकारी, विविध पक्षांचे पदाधिकाऱ्यांबरोबर बैठका घेणार आहेत.

**दौरा**

भारताच्या तिन्ही सेनादलाचे प्रमुख सरसेनाध्यक्ष जनरल उपेंद्र द्विवेदी आजपासून चार दिवसाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जात आहेत. भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढवण आणि

याबाबत दोन्ही देशाचे संबंध अधिक दृढ करण हा या दौऱ्याचा उद्देश असल्याच संरक्षण मंत्रालयाने म्हंटल आहे. या दौऱ्यादरम्यान जनरल उपेंद्र द्विवेदी दोन्ही देशांदरम्यान, संयुक्त लष्कर अभ्यास, प्रशिक्षण, अत्याधुनिक शस्त्रात्र आणि संरक्षण विषयक तंत्रज्ञानाची देवाण घेवाण आदि विविध विषयावर ऑस्ट्रेलियाच्या संरक्षण क्षेत्रातील वरिष्ठ नेतृत्वाबरोबर व्यापक चर्चा करणार आहेत.

**<u>बिल-गेट्स-आंध्र-भेट</u>**

गेट्स फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष बिल गेट्स आज आंध्र प्रदेशला भेट देणार आहेत. गेट्स, फाउंडेशनच्या सहा सदस्यांचं शिष्टमंडळ, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांची भेट घेतील. नागरिकांना सुविधा देण्यासाठी उभारण्यात आलेल्या तंत्रस्नेही प्रशासकीय केंद्राला ते भेट देणार आहेत. शिक्षण, आरोग्यसेवा आणि कृषी क्षेत्रात राज्य सरकार आणि बील गेट्स संस्थेदरम्यान सुरू असलेल्या सहकार्याचा विस्तार करण्यावर यावेळी चर्चा होण्याची अपेक्षा आहे. गेट्स आणि मुख्यमंत्री नायडू अमरावतीतील उंडावल्ली गावाजवळील एका कृषी क्षेत्रालाही भेट देणार आहेत.

**<u>डॉनल्ड ट्रम्प</u>**

गाझा पट्टीत शांतता प्रस्थापित करून तिथला पुनर्विकास करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शांती बोर्डाने 5 अब्ज डॉलर्स ची मदत करण्याच आश्वासन दिल आहे अस अमेरिकेचे राष्ट्रपती डॉनल्ड ट्रम्प यांनी म्हंटल आहे. या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्थैर्य आणि पोलिस दलासाठी हजारो  कर्मचारी पाठवण्याबद्दल शांती बोर्ड वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. या बोर्डाच्या सदस्यांची पहिली बैठक येत्या गुरुवारी वॉशिंग्टन इथ होणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

कोलंबो इथं काल झालेल्या वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट सामन्यात भारतानं पाकिस्तानचा 61 धावांनी पराभव करत सुपर एट गटात प्रवेश केला आहे. या विजयाने आतापर्यंत खेळल्या गेलेल्या वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानवर 9 सामन्यापैकी 8 सामन्यात मात केली आहे. कालच्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाल्याने भारताची सुरुवात वाईट झाली होती. परंतु ईशान किशनने 40 चेंडूत केलेल्या 77 धावांच्या जोरावर भारताने 175 धावा केल्या. पाकिस्तानचा पहिला फलंदाज संघाची धावसंख्या शून्य असताना बाद झाला. हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करत सुरुवातीलाच पाकिस्तानला धक्का दिला. पाकिस्तानचा संघ 114 धावांत बाद झाला. ईशान किशनला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं. भारताचा पुढील सामना 18 फेब्रुवारीला नेदरलँडसविरुद्ध होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.